ePaper
मुंबईसाठी शिंदे गट 125 जागांवर ठाम, भाजपा-शिवसेनेची जागावाट!
| वर्ष - 9 I अंक -113 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज (TM)

## आतील पानांत

- IPL 2026 लिलावात पैशांची बरसात!
- अय्यर ७ कोटीत आरसीबीच्या संघात
- तर वाहनांना पेट्रोल मिळणार नाही
- राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा रद्द

www.mahaenews.com | बुधवार, दि. 17 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## महापालिका निवडणूक : अजित पवारांचा रणशिंगनाद

# पिंपरीत राष्ट्रवादीचाच महापौर!

## ‘सत्ता कोणत्याही परिस्थितीत आणणार’; अजितदादांचा निर्धार

I पिंपरी I प्रतिनिधी I
महाईन्यूज

**महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात होत असतानाच उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे सर्वेसर्वा अजित पवार यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन केले आहे. “पिंपरी-चिंचवडमध्ये आगामी महापौर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचाच होईल,” असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. निवडणूक जाहीर झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी पुण्यात पिंपरीतील इच्छुक उमेदवारांच्या दिवसभर मुलाखती घेत अजित पवार यांनी पक्ष यंत्रणेला स्पष्ट दिशा दिली.**

“ही निवडणूक हलक्यात घेता कामा नये. सर्वांनी एकजुटीने काम करा. मी स्वतः पूर्ण क्षमतेने मैदानात उतरणार आहे. कोणत्याही परिस्थितीत महापालिकेची सत्ता राष्ट्रवादीकडे आणायची आहे,” असे स्पष्ट शब्दांत पवार यांनी कार्यकर्ते व नेत्यांना बजावले. त्यांच्या या भूमिकेमुळे पिंपरी-चिंचवडमधील राजकीय वातावरण अधिकच तापले आहे.



### महापौरपदावर राष्ट्रवादीचा दावा

सर्व घडामोडी पाहता राष्ट्रवादी काँग्रेसने महापौरपदावर ठाम दावा ठोकला आहे. “पिंपरीत राष्ट्रवादीचाच महापौर” हे वाक्य केवळ घोषणा न राहता प्रत्यक्षात उतरवण्यासाठी पक्षाकडून जोरदार तयारी सुरू आहे. आगामी काही दिवसांत उमेदवारांची घोषणा, प्रचाराची दिशा आणि रणनिती स्पष्ट होणार असून, पिंपरी-चिंचवडचे राजकारण आणखी तापणार हे निश्चित आहे.

### ३२ प्रभागांतील इच्छुकांच्या मुलाखती

पिंपरी-चिंचवडमधील भोसरी, पिंपरी आणि चिंचवड या तिन्ही विधानसभा मतदारसंघांतील एकूण ३२ प्रभागांमधून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती अजित पवार यांनी घेतल्या. प्रत्येक प्रभागातील स्थानिक राजकीय परिस्थिती, कार्यकर्त्यांची ताकद, जनतेतील स्वीकारार्हता, विकासकामांचा आढावा आणि आगामी रणनीती यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या वेळी विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष योगेश बहल, माजी आमदार विलास लांडे, निवडणूकप्रमुख नाना काटे, माजी नगरसेवक अजित गव्हाणे, कैलास बारणे, कार्याध्यक्ष फजल शेख आदी प्रमुख नेते उपस्थित होते.

### ‘विकासाचा चेहरा जनतेसमोर ठेवा’

अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पिंपरी-चिंचवड शहरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या सत्ताकाळात मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे. पाणीपुरवठा, रस्ते, शिक्षण, आरोग्य, क्रीडा संकुले, उद्याने, बीआरटी, रिंग रोडसारखे महत्त्वाचे प्रकल्प हे नियोजनबद्ध विकासाचे उत्तम उदाहरण आहेत. “या विकासकामांमुळे शहराचा चेहरामोहरा बदलला आहे. हीच कामे जनतेपर्यंत पोहोचवा. आपण सत्तेत असताना काय केले, हे नागरिकांना ठामपणे सांगा. जनता निश्चितच आपल्या पाठीशी उभी राहील,” असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### ‘मी सर्वस्व पणाला लावणार’

महापालिकेतील सत्ता परत मिळवण्यासाठी अजित पवार यांनी आपली भूमिका अधिक आक्रमक करत “मी या निवडणुकीसाठी माझे सर्वस्व पणाला लावणार आहे,” असे स्पष्ट केले. शहराला पुन्हा गतवैभव मिळवून देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

इच्छुकांच्या मुलाखती पूर्ण झाल्या असून उमेदवारांची अंतिम निवड स्वतः अजित पवार करणार आहेत. तीन ते चार दिवसांत उमेदवारांची अधिकृत घोषणा केली जाईल, अशी माहिती पक्षाचे कार्याध्यक्ष फजल शेख यांनी दिली.

### राष्ट्रवादीत प्रवेशांची लाट

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेशांची लाट सुरू झाली आहे. मंगळवारी भाजप आणि दोन्ही शिवसेनांना मोठा धक्का देत चार माजी नगरसेवकांसह अनेक पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. भाजपच्या माजी नगरसेविका व स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा सीमा सावळे, जाधववाडीतील माजी नगरसेविका अश्विनी जाधव, आकुर्डीतील शिवसेना (शिंदे) गटाचे माजी नगरसेवक प्रमोद कुटे, शिवसेना (ठाकरे) गटाचे महापालिका निवडणूकप्रमुख व माजी नगरसेवक सचिन भोसले, महिला संघटक रूपाली आल्हाट आणि उपशहरप्रमुख नेताजी काशीद यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात जाहीर प्रवेश केला.

या सर्वांनी प्रवेशावेळी सांगितले की, “प्रभागात काम करताना अनेक अडचणी आल्या. दबाव टाकून विकासकामे थांबवण्याचे प्रयत्न झाले. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काम करण्याची संधी मिळेल आणि जनतेच्या प्रश्नांना न्याय देता येईल, या विश्वासाने आम्ही प्रवेश घेतला.”

### महायुतीतून राष्ट्रवादी बाहेर

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे महापालिका निवडणुकीसाठी भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत युती होईल, मात्र अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत युती होणार नाही, असे स्पष्ट केले. या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली असून राष्ट्रवादी काँग्रेस वेगळ्याच मूडमध्ये असल्याचे चित्र आहे. राष्ट्रवादीचे नेते सुनील टिंगरे यांनी यावर प्रतिक्रिया देताना सांगितले, “हा आमच्यासाठी अतिशय चांगला निर्णय आहे. आमचे कार्यकर्ते अनेक वर्षांपासून जनतेच्या प्रश्नांसाठी अहोरात्र काम करत आहेत. आता त्यांना न्याय मिळण्याची वेळ आली आहे. पिंपरी-चिंचवडमधील सर्व ४१ प्रभागांमध्ये आम्ही पूर्ण ताकदीने लढणार आहोत.”

### पिंपरी-चिंचवडमध्ये थेट लढत

महायुतीतील घटक पक्ष वेगवेगळ्या भूमिका घेत असल्याने पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक चुरशीची ठरण्याची चिन्हे आहेत. भाजप-शिवसेना एकत्र तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) स्वतंत्रपणे मैदानात उतरल्याने थेट लढत पाहायला मिळणार आहे.

सर्वाधिक तक्रारी वाहनांसंदर्भात | पुण्याची जीवनवाहिनी म्हणून पीएमपीची ओळख

# ‘PMP’मध्ये प्रवाशांच्या तक्रारीचा पाऊस

## वर्षभरात ३४ हजार ८४३ तक्रारी दाखल



। पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणेकरांची जीवन वाहिनी असलेल्या पीएमपीविरोधात तक्रारींचा धो-धो पाऊस पडत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. स्वच्छता, चालक, वाहक तसेच मोबाईल ॲप यासंदर्भातील या तक्रारी असून, जवळपास १५ विविध कारणे देत पुणेकरांनी पीएमपीवर तीव्र नाराजी व्यक्त केली असल्याचे यावरून दिसत आहे. त्यामुळे पुणेकरांना ‘सेवा’ पुरविणाऱ्या पीएमपीला आणखी सुधारणा करण्याची अत्यंत गरज असल्याचे दिसत आहे. चालू वर्षात तब्बल ३५ हजार तक्रारी आल्या आहेत. आता या तक्रारीवरून प्रशासनाने नेमकी काय कारवाई केली, हा संशोधनाचा विषय होईल.**

पीएमपी सेवा ही पुणेकरांसाठी अत्यंत महत्वाची मानली जाते. लाखो प्रवासी यामधून दररोज प्रवास करतात. त्यामुळे याला विशेष महत्व आहे. पण, अनेकवेळा प्रवाशांना या पीएमपीचा त्रास सहन करावा लागतो. कधी पीएमपीमध्येच बंद पडते, तर कधी पीएमपी थांब्यावर थांबतच नाही. ती वेळेवर कधी पोहचतच नाही,अशा प्रमुख समस्यांनी प्रवाशी वैतागलेले असतात. त्यात आता प्रशासनाने प्रवाशांसाठी सुरू केलेले पीएमपीएलचे ऑनलाईन सेवा, पीएमपीमध्ये प्रचंड घाणीचे साम्राज्य झालेले असते. प्रचंड दुर्गंधी प्रवाशांना सहन करावी लागते. त्यासोबतच चालक व वाहक यांच्या बोलण्याचा ‘टोन’ प्रवाशांसोबत उर्मट, किंवा आवाजावी मोठा असतो. विशेष म्हणजे, चालक व वाहक यांच्यासंदर्भात सर्वाधिक तक्रारी चालू वर्षात आल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. त्यामुळे पुन्हा एकदा या चालक व वाहक यांची ‘शाळा’ घेण्याची गरज निर्माण झाली आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.येवढे तक्रारी येत असताना देखील बस सेवेत अपेक्षित सुधारणा होताना दिसून येत नाहीत. प्रवाशांकडून सातत्याने येणाऱ्या तक्रारींकडे प्रशासन गांभीर्याने पाहात नसल्याचा आरोप होत असून, तक्रारी ‘निकाली’ काढल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात समस्या तशाच आहेत. पीएमपीकडून पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए हद्दीत प्रवासी सेवा देण्यात येते. यातून रोज १० ते ११ लाख प्रवासी प्रवास करतात. मात्र, प्रवासादरम्यान बस थांब्यावर न थांबवणे, गाडी उशिरा आणणे, अस्वच्छ बस, नवीन मार्गांची मागणी, सिग्नल न पाळणे, वेगाने वाहन चालवणे अशा स्वरूपाच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर नोंदवल्या जात आहेत. परंतु, या तक्रारी सोडवण्याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत आहे. पीएमपीची हेल्पलाइन सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत सुरू असते. या कक्षात १२ कर्मचारी कार्यरत आहेत. कंट्रोल रूममध्ये आलेल्या तक्रारी संबंधित आगाराकडे पाठवल्या जातात. त्यात आगार स्तरावर (तृतीय स्तर) तक्रार सुटली नाही, तर ती दुय्यम स्तरावर सहव्यवस्थापकीय संचालकांकडे जाते. तेथेही न सुटल्यास पीएमपीचे अध्यक्ष स्वतः लक्ष घालून तक्रार सोडवतात.पीएमपीएकडे ज्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत त्या सर्व तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे. पीएमपीने दहा ते अकरा लाख प्रवासी प्रवास करतात. या तुलनेत या तक्रारी खूप कमी आहेत. तक्रारी कमी करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.पुणेकरांची जीवन वाहिनी असलेल्या पीएमपीविरोधात तक्रारींचा धो-धो पाऊस पडत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. स्वच्छता, चालक, वाहक तसेच मोबाईल ॲप यासंदर्भातील या तक्रारी असून, तीव्र नाराजी व्यक्त केली असल्याचे यावरून दिसत आहे. त्यामुळे पुणेकरांना ‘सेवा’ पुरविणाऱ्या पीएमपीला आणखी सुधारणा करण्याची अत्यंत गरज असल्याचे दिसत आहे. चालू वर्षात तब्बल ३५ हजार तक्रारी आल्या आहेत. आता या तक्रारीवरून प्रशासनाने नेमकी काय कारवाई केली, हा संशोधनाचा विषय होईल.

### पीएमपीमध्ये प्रचंड घाणीचे साम्राज्य

लाखो प्रवासी यामधून दररोज प्रवास करतात. त्यामुळे याला विशेष महत्व आहे. पण, अनेकवेळा प्रवाशांना या पीएमपीचा त्रास सहन करावा लागतो. कधी पीएमपीमध्येच बंद पडते, तर कधी पीएमपी थांब्यावर थांबतच नाही. ती वेळेवर कधी पोहचतच नाही,अशा प्रमुख समस्यांनी प्रवाशी वैतागलेले असतात. त्यात आता प्रशासनाने प्रवाशांसाठी सुरू केलेले पीएमपीएलचे ऑनलाईन सेवा, पीएमपीमध्ये प्रचंड घाणीचे साम्राज्य झालेले असते.

# बाप रे बाप! पुण्यनगरीची हवा ‘विषारी’

## आवश्यक उपाययोजना प्रत्यक्षात राबविल्या जात नसल्याचे चित्र



। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे शहरातील हवेची गुणवत्ता (POLLUTION)सातत्याने खालावत आहे. गेल्या काही आठवड्यांपासून शहरातील हवेची गुणवत्ता निर्देशांक (एक्युआय) सातत्याने ‘मध्यम’ (१०१-२००) ते ‘खराब’ (२०१-३००) या श्रेणीत नोंदवली जात आहे. असे असतानाही पुणे (PUNE) महापालिकेकडून (पीएमसी) ‘ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन’ (जीआरएपी) अंतर्गत आवश्यक उपाययोजना प्रत्यक्षात राबविल्या जात नसल्याने पर्यावरण तज्ज्ञांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.**

पुणे शहरासाठी तयार करण्यात आलेल्या ‘जीआरएपी’मध्ये ‘मध्यम’ आणि ‘खराब’ या दोन्ही श्रेणी एकत्र करून सात ठोस उपाययोजना निश्चित करण्यात आल्या आहेत. यामध्ये वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांची तैनाती, कचरा जाळण्यावर कडक बंदी व दंडात्मक कारवाई, बांधकाम स्थळांवरील धूळ नियंत्रण आणि नियमांचे पालन न करणाऱ्या ठिकाणी काम बंद करण्याच्या उपायांचा समावेश आहे. मात्र प्रत्यक्षात शहरातील परिस्थिती वेगळीच असल्याचे चित्र आहे. शहरात ऑक्टोबर २०२५ पासून १५ डिसेंबर २०२५ पर्यंतच्या सुमारे ७६ दिवसांपैकी तब्बल ४८ दिवस ‘मध्यम’ तर डिसेंबर महिन्यातील ६ दिवस ‘खराब’ श्रेणीत एक्युआय नोंदला गेला. या मर्यादा वारंवार ओलांडल्या जात असतानाही त्यानुसार लागू करावयाच्या ‘जीआरएपी’च्या टप्प्याटप्प्याने उपाययोजना शहरात प्रभावीपणे राबविल्या जात नसल्याचा आरोप पर्यावरण क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी केला आहे. यासंदर्भात महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

### काय आहे ‘जीआरएपी’?

वाहनांत अडकून प्रदूषित हवा श्वासात घ्यावी लागत आहे. गणेशखिंड रस्ता हा शहरातील सर्वाधिक वर्दळीचा भाग असून तिथे वाहतूक पोलिसांची ठोस तैनाती दिसून येत नाही. हीच परिस्थिती शहराच्या अनेक भागांत आहे. हिवाळ्यात प्रदूषक घटक हवेत अधिक काळ टिकून राहतात. त्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनविकार असलेल्यांसाठी धोका अधिक वाढतो, तरीही बांधकामधूळ, उघड्यावर कचरा जाळणे आणि खासगी वाहनांच्या वापरावर मर्यादा आणण्यासाठी योग्य उपाययोजना केल्या जात नाहीत.

महापालिका निवडणूक रणधुमाळी: नाराज इच्छुकांना पक्षात प्रवेश देत

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून धक्का तंत्र!

## सीमा सावळे, माजी नगरसेवक अश्विनी जाधव, प्रमोद कुटे, तुषार सहाने यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांना पक्षात प्रवेश



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड शहर भाजपला धक्का दिला. राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाने मंगळवारी धक्का तंत्र अवलंबत अनेक नाराज इच्छुकांना पक्षात प्रवेश देत निवडणुकीच्या रणधुमाळीत जोरदार मुसंडी मारली आहे. आजच्या पक्षप्रवेशांमध्ये भाजपच्या स्थायी समितीच्या माजी अध्यक्ष सीमा सावळे ,माजी नगरसेवक अश्विनी जाधव, प्रमोद कुटे, तुषार सहाने यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांना पक्षात प्रवेश देण्यात आला आहे.**

गेल्या काही दिवसांपासून शांत भूमिका घेणाऱ्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अंतर्गत हालचालींना वेग आला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामार्फत शहर अंतर्गत सर्व्हे सुरू आहे. आगामी काळात निवडणुकीसाठी सक्षम उमेदवार शोधले जात आहेत. ज्या प्रभागात पक्षाकडे उमेदवार नाहीत. तेथे भाजपच्या अथवा नवख्या, पण बलाढ्य उमेदवाराचा पर्याय पक्षाकडून शोधला जात आहे. आज त्यावर शिक्कामोर्तब झाले.

आजच्या पक्षप्रवेशांमध्ये भाजपच्या स्थायी समितीच्या माजी अध्यक्ष सीमा सावळे ,माजी नगरसेवक अश्विनी जाधव, प्रमोद कुटे, तुषार सहाने यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांना पक्षात प्रवेश देण्यात आला आहे. महापालिकेत २०१७ मध्ये भाजपची सत्ता आणण्यात सावळे यांचेही योगदान मानले जाते. त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सत्ताकाळातील महापालिकेतील चुकीच्या कामांविरोधात रान पेटविले होते. कथित भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठविला होता. महापालिकेत भाजपची सत्ता आल्यानंतर २०१७ मध्ये पहिल्यांदाच त्यांना स्थायी समितीचे अध्यक्षपद देण्यात आले होते. परंतु, कालांतराने त्यांचे भाजप नेतृत्वाशी सूर जुळले नाहीत. त्यातूनच त्यांनी २०१९ ची विधानसभेची निवडणूक अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर विधानसभा मतदारसंघातून अपक्ष लढविली होती. आता सावळे यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. सावळे यांच्या प्रभाग क्रमांक आठ इंद्रायणीनगरमधून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेले शिवसेना (ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी तुषार सहाने यांनीही राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला आहे. याबरोबर शिवसेना (शिंदे) पक्षाचे खासदार श्रीरंग बारणे यांचे विश्वासू असलेले आकुर्डीचे माजी नगरसेवक प्रमोद कुटे यांनीही राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. कुटे यांचा राष्ट्रवादीतील प्रवेश खासदार बारणे यांच्यासाठी धक्का मानला जात आहे. जाधववाडीमधील भाजपच्या माजी नगरसेवक अश्विनी जाधव, आकुर्डीतील शिवसेनेचे (शिंदे) माजी नगरसेवक प्रमोद कुटे, शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या महिला संघटिका रुपाली आल्हाट, शिवसेनेचे उपशहरप्रमुख नेताजी काशीद यांनी मंगळवारी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षात प्रवेश केला. प्रभागात काम करित असताना अनेक अडचणी आल्या. दबाव टाकून कामे थांबविण्याचा प्रयत्न केला. अजित पवार यांचे काम आवडते. जागेवर काम मार्गी लावतात. त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये (अजित पवार) प्रवेश केला असल्याचे या सर्वांनी सांगितले.

# पिंपरीसाठी दोन नवीन पोलीस ठाण्यांना मंजुरी

## परिमंडळ चारच्या निर्मितीवर शिक्कामोर्तब; तीन उपायुक्त, सहा आयुक्तांच्या पदानांही मान्यता

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाअंतर्गत वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी तसेच, औद्योगिक पट्ट्यातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न विचारात घेऊन राज्य शासनाने चाकण, आळंदी आणि महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यांचे विभाजन करून चाकण दक्षिण, उत्तर महाळुंगे या दोन नवीन पोलीस ठाण्यांना मान्यता दिली आहे.**




परिमंडळ चारच्या निर्मितीवरही शिक्कामोर्तब करण्यात आले. तीन पोलीस उपायुक्त, सहा सहायक पोलीस आयुक्तांची पदेही मंजूर झाली आहेत. पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत सध्या तीन परिमंडळे आहेत. प्रत्येक परिमंडळात प्रस्तावित पोलीस ठाण्यांसह आठ पोलीस ठाण्यांचा समावेश होता. वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी राज्य शासनाकडे चौथे परिमंडळ निर्माण करण्यासाठी प्रस्ताव महासंचालक कार्यालयामार्फत पाठवला होता. त्याला मान्यता मिळाली असून दोन सहायक पोलीस आयुक्त विभाग देखील वाढवले जाणार आहेत. चाकण आणि आळंदी पोलीस ठाण्याचे विभाजन करून चाकण दक्षिण, उत्तर महाळुंगे या पोलीस ठाण्यांना मान्यता मिळाली आहे. या दोन नवीन पोलिस ठाण्यांसाठी विविध संवर्गातील एकूण ३३२ पदे दोन टप्प्यांत निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यामध्ये अधिकारी व अंमलदार स्तरावरील पदांचा समावेश आहे. दोन्ही पोलीस ठाण्यांसाठी प्रत्येकी चारBपोलीस निरीक्षक, सहा सहायक पोलीस निरीक्षक, १३ उपनिरीक्षक, १३ सहायक उपनिरीक्षक, ४४ हवालदार, ८४ पोलीस शिपाई पदांना दोन टप्प्यात मंजुरी दिली. आहे. शहर पोलीस दलात आता सायबरसह २५ पोलीस ठाणे होणार आहेत. यामुळे पोलिस ठाण्यांचे दैनंदिन कामकाज, गस्त, तपास आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्यासाठी ३१ कोटी ४३ लाख २२ हजार ९२० रुपये खर्चाला मान्यता मिळाली आहे.

परिमंडळाची नव्याने रचना परिमंडळ एकमध्ये निगडी, चिंचवड, पिंपरी, संत तुकारामनगर, दापोडी, सांगवी, परिमंडळ दोनमध्ये हिंजवडी, बावधन, रावेत, वाकड, काळेवाडी, परिमंडळ तीनमध्ये एमआयडीसी भोसरी, भोसरी, दिघी, चाकण उत्तर, चाकण दक्षिण, आळंदी आणि परिमंडळ चारमध्ये शिरगाव-परंदवडी, देहूरोड, चिखली, तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी, उत्तर म्हाळुंगे एमआयडीसी, दक्षिण म्हाळुंगे एमआयडीसी या पोलीस ठाण्यांचा समावेश असणार आहे. हिंजवडी व महाळुंगे एमआयडीसी विभाग नव्याने निर्माण झाले आले आहेत.

### अपर आयुक्तपदी तेली

शहर पोलीस दलात सध्या सहा पोलीस उपायुक्त आणि १२ सहायक पोलीस आयुक्त कार्यरत आहेत. गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस उपमहानिरीक्षक बसवराज तेली यांची अपर पोलीस आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. यासाठी पोलीस उपआयुक्तपद उन्नत केले आहे. गणेश इंगळे व प्रदीप जाधव यांची पोलीस उपायुक्त म्हणून नियुक्ती झाली आहे. तसेच, सत्यजित आदमने यांची सहायक पोलिस आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालया अंतर्गत आता आठ उपायुक्त आणि १८ सहायक पोलीस आयुक्त असणार आहेत. याविषयीच्या खर्चालाही शासनाने मान्यता दिली आहे. हा खर्च संबंधित वर्षांच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून करण्यात येणार आहे.



## भूमिका

# घटस्फोट टाळायचा तर...

**आ पल्या देशात घटस्फोटाचं प्रमाण जगातल्या इतर देशांच्या तुलनेत कमी आहे; पण महाराष्ट्रात मात्र हे प्रमाण जास्त, म्हणजे सुमारे १८.७ टक्के इतकं वाढलेलं आहे. दरवर्षी राज्यात १ ते १ लाख ३६ हजार घटस्फोट होतात, असं आकडेवारी सांगते.**

ही आकडेवारी असंही सांगते की, भारतात अजूनही विवाहसंस्था मजबूत आहे; पण शहरी भागात घटस्फोटांचं प्रमाण वाढत आहे. घटस्फोट म्हणजे विवाहाचा विग्रह, प्रेमीयुगुलांची फाटाफूट म्हणजे ब्रेकअप आणि विवाहित जोडप्यांची फाटाफूट म्हणजे घटस्फोट. घटस्फोट झाल्यानंतर पती-पत्नी, मुलं कुटुंब एकमेकांपासून तुटतात. एक कुटुंब उद्ध्वस्त होतं. लग्नापूर्वी एकमेकांना ओळखणारी जोडपी म्हणजे प्रेम करणारी जोडपी जेव्हा विवाह करून एकत्र येतात, तेव्हा काही दिवसांनी त्यांना एकमेकांमधले दोष दिसायला लागतात. प्रेम करत असताना ते भरपूर एकत्र फिरतात, सतत भेटतात, आणाभाका घेतात; पण प्रेमाच्या धुंदीत त्यांना एकमेकांमधले दोष दिसत नाहीत. काहीतरी तडजोड करून एकत्र राहावं, असंही त्यांना वाटत नाही. मग, घटस्फोट हा मार्ग तरतो. आपली मन जुळलेली आहेत, आपल्याला कोणीही तोडू शकत नाही, असं त्यांना लग्नापूर्वी वाटत असतं; पण लग्नानंतर मात्र ही भावना बदलते. जुळलेली मनं तुटायला वेळ लागत नाही. ठरवून



केलेल्या लग्नात 'लग्न ही तडजोड आहे' हे दोघांनी आणि दोघांच्या कुटुंबीयांनी मान्यच केलेलं असतं. त्यामुळे ही जोडपी दीर्घकाळ संसार करत राहतात. अगदी असह्य होईपर्यंत ते एकमेकांच्या जवळ राहतात. भले एकमेकांची तोंड बधण्याची इच्छा नसली, तरीही कुटुंबीयांच्या सौख्यासाठी ते एकत्र राहतात. मध्यंतरी माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी एका सुनावणीदरम्यान 'प्रेमविवाहातूनच घटस्फोटाची सर्वाधिक प्रकरणे समोर येत आहेत. कारण, या विवाहामध्ये अनेकदा कुटुंबापेक्षा वैयक्तिक निवडीला महत्त्व दिलं जातं. त्यातूनच नंतर समस्या निर्माण होतात,' असं म्हटलेलं आहे. प्रेमविवाह असो की ठरवून केलेलं लग्न असो, घटस्फोटांचं कारण काय, हा विषय महत्त्वाचा आहे. एकमेकांची मनं जुळलेली नसतानाही ती जुळलेली आहेत, असं आधी वाटतं आणि नंतर अपेक्षाभंग होतो. 'सून आणावी गरिबांच्या घरची आणि लेक द्यावी श्रीमंतांच्या घरी' असं आपल्याकडे म्हटलं जातं; पण श्रीमंतांच्या घरची हाव मोठी असते आणि ही कुटुंबं हंडा, आलिशान कार, बंगला यासाठी सुनेचा छळ करुण्म आत्महत्या करायला भाग पाडतात, हे अलीकडच्या काही उदाहरणांवरून दिसून आलेलं आहे. जी सून खून किंवा आत्महत्येला बळी पडत नाही, ती कणखरपणे घटस्फोटाला सामोरी जाते. अर्थात, त्यासाठी माहेरचा नैतिक आणि खंबीर पाठिंबा असावा लागतो. नवरा व्यसनाधीन असेल, तर तो पत्नीचा शारीरिक आणि मानसिक छळ करतो. गुटखा, तंबाखू, दारू ही व्यसनं नवऱ्याचं शरीर आणि संसार हे दोन्ही पोखरतात. त्याचं व्यसन अनावर झाल्यास संसार उद्ध्वस्त होतो व पत्नी घटस्फोटाचा निर्णय घेते. घटस्फोटामुळं कुटुंबाची होरपळ होते. अशावेळी नवऱ्यानं सोडायला हवं, त्यासाठी योग्य ते उपाय करायला हवेत. पती-पत्नीचा घटस्फोट झाल्यावर पहिला धक्का बसतो तो अपत्यांना. त्यांचं पालनपोषण, शिक्षण, वयोमानानुसार होणारे शारीरिक-मानसिक बदल यावर त्याचा गंभीर परिणाम होतो. मुलगीचे माहेरी अतिलाड झालेले असतील, तर ती हट्टी असू शकते. नवऱ्याच्या परिस्थितीचा विचार न करता ती सासरी नांदते. तिचा जास्त ओढा माहेराकडे असतो. त्यातली मोठी समस्या म्हणजे मुलीच्या आईचा तिच्या संसारात हस्तक्षेप वाढत जातो. मार्गदर्शन करणं, सूचना करणं हे वेगळं आणि मुलीच्या सासरघरी हस्तक्षेप करणं वेगळं. अशा हस्तक्षेपामुळं बांगले चाललेले संसार मोडल्याची कितीतरी उदाहरणं आहेत. मुलीच्या आई-वडिलांनी मुलीच्या संसारावर तटस्थपणे लक्ष ठेवावं. लागेल ते सहकार्य तिला करावं; पण ढवळाढवळ मात्र करू नये. मुलीचा सासरी छळ होतो का? तिला मारहाण होते का? सारख्या मुलीच होतात आणि आता मुलगाच हवा म्हणून त्रास दिला जातो का? अशा गोष्टींकडे मुलीच्या आई-वडिलांनी अवश्य लक्ष दिलं पाहिजे.

## प्रासंगिक »

# ज्यूंच्या हत्येचे प्रयत्न

***गेल्या वर्षभरात ज्यू पालकांना त्यांच्या मुलांना डेकेअरमध्ये पाठवण्याची भीती वाटत असल्याच्या बातम्या आल्या आहेत.***

आता ज्यूंसाठी इस्त्रायल हे जगातील एकमेव सुरक्षित ठिकाण असल्याचे दिसते. 'ॲलेक्स रिवचिन'च्या संघटनेने अहवाल दिला आहे, की ३० सप्टेंबरपर्यंतच्या वर्षात अंदाजे १,६०० यहुदीविरोधी घटना नोंदवल्या गेल्या. हमासच्या हल्ल्यांपूर्वी आणि इस्रायलच्या प्रतिसादापेक्षा ही संख्या जवळजवळ तिप्पट आहे. गाझा युद्धानंतर ऑस्ट्रेलियातील ज्यू समुदायाविरुद्धच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. देशाच्या गुप्तचर संस्थेच्या प्रमुखांनी याला जीवघेणा सर्वात मोठा धोका म्हणून वर्णन केले. रविवारी सिडनीच्या बोंडाई बीचवर हनुक्का उत्सवादरम्यान झालेल्या गोळीबारात १२ जणांचा मृत्यू झाला. निशस्त्र लोक उत्सवासाठी जमले असताना त्यांच्यावर गोळीबार करण्याचा संतापजनक प्रकार घडला. पहलगाममध्ये जसे निशस्त्र पर्यटकांना पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद्यांनी लक्ष्य केले, तसेच लक्ष्य यहुदींना बाप-बेट्यांनी केले.

एके काळी गाव म्हणजे केवळ राहण्याचे ठिकाण नव्हते; ते एक जिवंत नातेसंबंधांचे विश्व होते. मातीशी नाळ जोडलेली, माणसाशी मन जोडलेली आणि परंपरेशी आत्मा बांधलेली अशी ती संस्कृती होती. आज मात्र त्या गावाच्या अंगणात उभे राहून पाहिले, तर प्रश्न पडतो. आपण गावात आहोत की शहराच्या सावलीत?

# गावाचे गावपण मरणाला टेकले आहे

कारण गावाचे गावपण हळूहळू मरणाच्या उंबरठ्यावर उभे आहे. पूर्वी गावात सकाळ होत असे ती कोंबड्याच्या आरवण्याने, मंदिराच्या घंटानादाने आणि बैलांच्या गळ्यातील घुंगरांच्या सुरांनी. आज तीच सकाळ मोबाईलच्या अलार्मने, ट्रॅक्टरच्या कर्कश आवाजाने आणि शहरातून आलेल्या सवयींनी सुरू होते. अंगणात बसून चुलीवर चहा करणारी आजी, ओट्यावर जमणारे गावकरी, विहिरीवरची गप्पांची मैफल, हे सगळे आता आठवणींच्या कप्प्यात बंद झाले आहे. विहिरींना सिमेंटचे कडे आले, पण त्याबरोबरच संवादाची खोली आटत गेली. गावपणाचे खरे सौंदर्य माणसांमधील आपुलकीत होते. सुख-दुःखात धावून जाणारी पावले, लग्न-बारशांना अख्खे गाव सहभागी होणे, सण-उत्सवांना जात-पात विसरून एकत्र येणे, हीच तर गावाची ओळख होती. आज मात्र घरांच्या भिंती उंच झाल्या आणि मनांमधील भिंती त्याहून उंच



झाल्या. शेजाऱ्याचे नाव माहिती नसते, पण शहरातील सेलिब्रिटीची बातमी क्षणात पोहोचते. नात्यांची ऊब कमी होत चालली आहे. शेती ही गावाची शान होती. मातीशी बोलणारा शेतकरी, पावसाशी संवाद साधणारा शिवार, हीच गावाची ओळख. आज शेतीही आकड्यांच्या गणितात अडकली आहे. रासायनिक खतांनी मातीचा श्वास कोंडला, कर्जाच्या ओझ्याने शेतकऱ्याचे मन दडपले. शेती व्यवसाय बनली, पण त्यातील आत्मा हरवला. शिवारात गाणारी पाखरे कमी झाली, आणि शेतकऱ्याच्या ओठांवरील हसूही विरले. गावाच्या संस्कृतीला लोककला, भजन, कीर्तन, भारूड यांचा आधार होता. या कला केवळ करमणूक नव्हत्या; त्या समाजाला दिशा देणाऱ्या होत्या. आज त्या मंचांवरून उतरून मोबाईलच्या छोट्या पडद्यावर अडकल्या आहेत. परंपरा 'जुनी' म्हणून बाजूला सारली जाते, पण तिच्या जागी आलेले नवे मूल्य किती टिकाऊ आहे, हा प्रश्न अनुत्तरितच आहे. शिक्षण आणि विकासाने गावाला नवी दारे उघडली, हे नक्कीच मान्य करावे लागेल. पण या विकासाच्या नावाखाली गावाने स्वतःची ओळख गमावली. कॉंक्रीटच्या घरांनी मातीचा गंध झाकला, आणि वेगाने धावणाऱ्या जीवनशैलीने निवांतपणाचा श्वास हिरावला. शहराची नक्कल करताना गावाने आपले वेगळेपण विसरले.

गावातील सळसळतं तारुण्य महानगराच्या दिशेने धावत आहे. म्हणून गावं ओस पडत चालली आहेत. बुलढाण्याचे प्रसिद्ध कवी गजानन बाठे त्यांच्या कवितेत असे सांगतात

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## लाभांकडे दुर्लक्ष नको

## दोन लाख घरे बांधण्याचा प्रकल्प प्रगतीपथावर

# हितासाठी धारावी पुनर्विकास प्रकल्प!

### प्रकल्पामागील सकारात्मक हेतू

### नागरिकांना याचा लाभ होणार

भाडेतत्त्वावरील निवास व्यवस्था ही जवळपास १० लाख धारावीकरांच्या पुनर्वसनासाठी राबविण्यात येणाऱ्या या व्यापक प्रकल्पाच्या उद्देशाला कोणताही अडथळा निर्माण करू शकत नाही. धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत सुमारे १.२५ लाख घरे उपलब्ध करून देण्यात येणार असून लाखो नागरिकांना याचा लाभ होणार आहे.



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**धारावीतील रहिवाशांना सन्मानपूर्वक त्यांच्या नव्या घरांमध्ये स्थलांतरित करण्यात येईल, अशी स्पष्टोक्ती धारावी पुनर्विकास प्रकल्प ( डीआरपी) आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिली आहे. धारावीतील सेक्टर १ मधील गणेश नगर – मेघवाडी परिसरातील सुमारे ४२ रहिवाशांना दिलेल्या नोटिसांबाबत प्रतिक्रिया देताना डॉ. कल्याणकर यांनी याबाबत भाष्य केले आहे.**

धारावीतील नागरिक अनेक दशकांपासून अत्यंत दयनीय व अस्वच्छ परिस्थितीत राहत आहेत. त्यांच्यासाठी पुनर्विकास हा पर्याय नसून गरज आहे. मात्र धारावी ही अत्यंत दाट लोकवस्तीची झोपडपट्टी असल्याने मोकळी जागा अत्यंत मर्यादित आहे. त्यामुळे बांधकाम सुरू करण्यासाठी काही रहिवाशांचे तात्पुरते स्थलांतर अपरिहार्य ठरते. आमचा उद्देश सुरुवातीपासूनच रहिवाशांना झोपडीतून पुनर्वसनाच्या माध्यमातून उत्तम घरांमध्ये स्थलांतरित करण्याचा आहे. असे असले तरीही, गणेश नगर – मेघवाडी किंवा रेल्वे जमिनीवरील काही ठिकाणी तात्पुरते स्थलांतर टाळता येत नाही. हे सर्व कायद्याच्या तरतुदींनुसारच करण्यात येत आहे तर "सुमारे काही हजार रहिवाशांचे तात्पुरते स्थलांतर किंवा भाडेतत्त्वावरील निवास व्यवस्था ही जवळपास १० लाख धारावीकरांच्या पुनर्वसनासाठी राबविण्यात येणाऱ्या या व्यापक प्रकल्पाच्या उद्देशाला कोणताही अडथळा निर्माण करू शकत नाही. धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत सुमारे १.२५ लाख घरे उपलब्ध करून देण्यात येणार असून लाखो नागरिकांना याचा लाभ होणार आहे. अशा मोठ्या आणि गुंतागुंतीच्या नागरी पुनरुज्जीवन प्रकल्पांमध्ये असे निर्णय आवश्यक असतात. आमची तातडीची प्राथमिकता म्हणजे बांधकामासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून पुनर्वसनाच्या घरांचे काम शक्य तितक्या लवकर सुरू करणे आहे. असे स्पष्टीकरण देखील यावेळी त्यांनी दिले. प्रकल्प अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, संबंधित ४२ रहिवाशांच्या झोपड्या हटविणे आवश्यक असून, त्या ठिकाणी १८०० मिमी व्यासाची सांडपाणी वाहिनी टाकण्यात येणार आहे. ही वाहिनी सार्वजनिक आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची सार्वजनिक सुविधा आहे. या संदर्भात डॉ. कल्याणकर म्हणाले, "या कुटुंबांचे स्थलांतर सुलभ होण्यासाठी आम्ही भाडे सहाय्य, मध्यस्थी शुल्क सहाय्य (ब्रोकरेज) यासह सर्वतोपरी मदत देत आहोत." सध्याच्या व्यवस्थेनुसार तळमजल्यावरील पात्र निवासी रहिवाशांना दरमहा १८,००० रुपये इतके भाडे देण्यात येत असून, स्थलांतराच्या वेळी १२ महिन्यांचे भाडे आगाऊ दिले जात आहे. त्यानंतर दरमहा थेट भाडे देण्यात येईल. पहिल्या मजल्यांवरील पात्र निवासी रहिवाशांना दरमहा १५,००० रुपये इतके भाडे देण्यात येत असून, १२ महिन्यांचे भाडे आगाऊ दिले जात आहे. त्यानंतर त्यांनाही मासिक भाडे देण्यात येईल. तळमजल्यावरील पात्र व्यावसायिक रहिवाशांना त्यांच्या गाळ्याच्या कार्पेट क्षेत्रफळानुसार दर चौ.फुट १७५ रुपये इतके मासिक भाडे देण्यात येत असून, १२ महिन्यांचे भाडे आगाऊ दिले जात आहे. त्यानंतर दरमहा भाडे दिले जाईल. सर्व पात्र रहिवाशांना भाड्यात दरवर्षी ५ टक्के वाढ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. ही वाढ संबंधित घरमालकांनी संपूर्ण रिक्त घराचा ताबा दिल्यापासून १२ महिन्यांनंतर लागू होईल," असेही डॉ. कल्याणकर यांनी नमूद केले.तर या स्थलांतराचा उल्लेख करत ते म्हणाले,"शताब्दी नगरमधील पात्र रहिवाशांना अत्यंत सन्मानपूर्वक म्हाडाच्या संक्रमण इमारतींमध्ये ( ट्रान्झिट कॅम्प ) स्थलांतरित करण्यात येत आहे. प्रत्येक धारावी वासियाने सन्मानाने आणि सुखद आयुष्य जगावे, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

# 100 उठाबशा अन् विद्यार्थ्यांनीचा मृत्यू!

## शाळेत उशिरा पोहोचल्याबद्दल देण्यात आलेल्या शारीरिक शिक्षेमुळे तिचा मृत्यू

### पोस्टमॉर्टेमनंतर सत्य समोर

काजलला शिक्षा देणारी शिक्षिका ममता यादव हिच्याविरुद्ध वालीव पोलिसांनी खून न करता होणाऱ्या हत्याकांडाच्या आरोपाखाली एफआयआर दाखल केला आणि नंतर तिला अटक केली. पालकांनी शाळा आणि शिक्षिकेविरुद्ध लेखी तक्रार दाखल केली आणि ती क्रूर शारीरिक शिक्षा असल्याचे वर्णन केले.



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**८ नोव्हेंबर रोजी वसई पूर्वेतील श्री हनुमान विद्या मंदिर हायस्कूलमध्ये सहावीतली विद्यार्थीनी उशीरा पोहचली म्हणून शिक्षकाने १०० उठाबशा काढायला लावल्या. या उठाबशामुळे एका १३ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची बातमी पसरली. या मुलीच्या मृत्यूमुळे केवळ पालकांमध्येच नव्हे तर सामाजिक संघटना आणि शिक्षण अधिकाऱ्यांमध्येही तीव्र तणाव निर्माण झाला.**

१३ वर्षीय विद्यार्थिनीला १०० उठाठेवायला लावण्यात आले, तब्येत बिघडली आणि तिचा मृत्यू झाला. वसई पूर्वेतील श्री हनुमान विद्या मंदिर हायस्कूलमध्ये १३ वर्षीय इयत्ता सहावीत शिकणाऱ्या काजल गौरच्या मृत्यूने संपूर्ण राज्याला धक्का बसला. उशिरा पोहोचल्याबद्दल तिला देण्यात आलेल्या कठोर शारीरिक शिक्षेमुळे तिचा मृत्यू झाला. या घटनेमुळे एका विद्यार्थिनीचा मृत्यू झालाच, पण शिस्तीच्या नावाखाली मुलांच्या आरोग्याशी आणि जीवनाशी तडजोड करण्याच्या मानसिकतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले.८ नोव्हेंबर रोजी इयत्ता सहावी वर्गातील विद्यार्थीनी काजल गौर काही मिनिटे उशिरा शाळेत पोहोचली. यामुळे संतप्त होऊन एका शिक्षिकेने तिला शिक्षा म्हणून शाळेच्या कॅम्पसमध्ये १०० वेळा उठाबशा कढायला लावल्या. शाळेची बॅग घालून विद्यार्थिनीला हा शारीरिक व्यायाम करायला लावण्यात आला. उठाबशा दरम्यान तिची प्रकृती आणखी बिकट झाली, परंतु कोणीही ते गांभीर्याने घेतले नाही. श्वास घेण्यास त्रास आणि अत्यंत अशक्तपणा जाणवू लागला. संध्याकाळपर्यंत तिची प्रकृती आणखी बिकट झाली आणि तिच्या कुटुंबाने तिला जवळच्या स्थानिक रुग्णालयात दाखल केले. तिची प्रकृती बिघडल्याने तिला मुंबईतील जेजे रुग्णालयात हलवण्यात आले, जिथे जवळजवळ एक आठवड्यानंतर १४ नोव्हेंबर रोजी तिचा मृत्यू झाला.पोस्टमॉर्टेममध्ये असे दिसून आले की, काजल पूर्वीपासून असलेल्या कमकुवतपणा आणि आरोग्य समस्यांमुळे (जसे की ॲनिमिया आणि दमा) कठोर शारीरिक व्यायाम सहन करू शकत नव्हती. कुटुंबाने म्हटले आहे की त्यांच्या मुलीला अशी प्राणघातक शिक्षा देणे अमानवीय आहे. शाळा प्रशासनाने ही घटना लपवण्याचा प्रयत्न केला आणि वेळेवर वैद्यकीय मदत दिली गेली नाही. नेहमीप्रमाणे शाळेत गेलेली एक होनहार मुलगी कधीही परतली नाही.

## दिल्ली सरकारची मोठी घोषणा

## प्रदूषण प्रमाणपत्र (पीयूसीसी) आवश्यक

# तर वाहनांना पेट्रोल मिळणार नाही

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीतील प्रदूषणाची परिस्थिती भयानक आहे. दरम्यान, दिल्ली सरकारने काही कडक उपाययोजना केल्या आहेत. दिल्ली सरकारने घोषणा केली आहे की गुरुवार (१८ डिसेंबर) पासून प्रदूषण प्रमाणपत्र नसलेल्या वाहनांना पेट्रोल पुरवले जाणार नाही. याचा अर्थ असा की वाहनात इंधन भरण्यासाठी प्रदूषण प्रमाणपत्र (पीयूसीसी) आवश्यक असेल. शिवाय, पीयूसीसी प्रमाणपत्र नसल्याबद्दल ७ लाख रुपयांपेक्षा जास्त दंड आकारला जाईल असे म्हटले आहे.**

पर्यावरण मंत्री मनजिंदर सिंग सिरसा यांनी सांगितले की दिल्लीतील प्रदूषणाची परिस्थिती गंभीर टप्प्यावर आहे. त्यांनी सांगितले की गेल्या १० वर्षांपासून हीच स्थिती आहे. गेल्या वर्षी ते ३८० होते, आता ३६३ आहे. दिल्लीतून पळून गेलेले लोक सध्या चित्रपट पाहत आहेत. प्रदूषण हा त्यांनी निर्माण केलेला आजार आहे आणि तेच निषेध करत आहेत.मनजिंदर सिंग यांनी सांगितले की ते सतत काम करत आहेत आणि प्रदूषण नियंत्रित करत आहेत. गेल्या वर्षीपेक्षा प्रदूषण कमी आहे. “मला सांगा डिसेंबरमध्ये किती दिवस स्वच्छ होते,” ते म्हणाले. त्यांनी जोडले की आज कडक उपाययोजना केल्या जात आहेत. ते म्हणाले की, दिल्ली सरकारला कचऱ्याचा डोंगर १५ मीटरने कमी करण्यात यश आले आहे. त्यांनी २०२ एकरपैकी ४५ एकर जमीनही साफ केली आहे.

